**डॉ.पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती साजरी करण्यासाठी प्रस्तावित कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी समितीची स्थापना.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/का-२९अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-११ सप्टेंबर, २०२३.

**प्रस्तावना :-** राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, इतिहास प्रसिध्द व्यक्ती, संत महात्मे, प्रसिध्द राजकीय व्यक्ती यांच्या जन्मशताब्दी साजऱ्या करण्याबाबत निरनिराळ्या संस्था, व्यक्ती व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार शासनास मागण्या प्राप्त होत असतात. यासंदर्भात काहीवेळा विधानमंडळात चर्चाही होते. अशा प्रकारे जन्मशताब्दी साजऱ्या करण्याच्या अनुषंगाने होणाऱ्या मागण्यांबाबत कोणत्या विभागाने कार्यवाही करावी याचा शासन कार्यनियमावलीमध्ये स्पष्ट उल्लेख नाही. तथापि, उपरोल्लेखित थोर व्यक्ती, समाजसुधारक यांच्या कार्याची, सांस्कृतिक वारशाची ओळख आगामी पिढ्यांना होण्यासाठी थोर व्यक्तींच्या जन्मशताब्दी साजऱ्या होणे आवश्यक असल्याचे जाणवते. अशा समाजसुधारकांचे लोकोत्तर व्यक्तींचे शतकी व शतकोत्तर जन्मशताब्दी कार्यक्रम शासनाकडून आयोजित केले जावेत. यादृष्टीने व्यापक धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यास अनुसरुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** भारताचे **पहिले कृषी मंत्री** डॉ.पंजाबराव देशमुख यांचा कृषी आाणि शैक्षणिक क्षेत्रात सिंहाचा वाटा आहे. त्याकाळात **"भारत कृषक समाजाची "**स्थापना केली. व १९५९- १९६० साली भव्य दिव्य **पहिले जागतिक कृषी प्रदर्शन दिल्ली** येथे भरविले. गोरगरीब मुलांच्या शैक्षणिक सुविधाकरीता १९३२ साली **"श्री.शिवाजी शिक्षण संस्थेची"** स्थापना केली. तसेच महाविद्यालये, अभियांत्रिकी पदवी, पदविका तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये सुरु करुन शिक्षण क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले. तसेच ब्रिटन मध्ये डॉक्टरेटचे शिक्षण घेऊन परतल्यानंतर शासकीय नोकरी किंवा व्यवसायच्या मागे न लागता स्वत:ला सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्यात झोकून दिले. आयुष्यभर कृषी, शिक्षण, सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहीले. अशा थोर पुरुषाचे १२५ वी जयंती साजरी करण्याचा निर्णया शासनाच्या विचाराधीन होता. त्यामुळे **"दि. २७ डिसेंबर,२०२३ ते दि.२६ डिसेंबर, २०२४ हे त्यांचे १२५ वी जयंती वर्ष "**साजरे करण्याकरिता प्रस्तावित कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी **विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली** समिती गठीत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम समिती गठित करणे :-** डॉ.पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती साजरी करण्याकरीता हाती घ्यावयाचे कार्यक्रम ठरविण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली ३ समिती सदस्य यांचा अंतर्भाव करुन राज्य शासनातर्फे आयोजित करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरवावी.

**कार्यक्रमांवरील खर्च :-** सदर कार्यक्रमांचे आयोजन व त्यावरील भविष्यात येणारा खर्च, मान्यवर ज्या क्षेत्राशी संबंधित आहेत त्या क्षेत्राशी संबंधित प्रशासकीय विभागाने मंजूर तरतूदीतून किंवा आवश्यकता भासल्यास योग्य ती तरतूद करुन भागवावा.

**<u>सर्वसाधारण सूचना</u>:-**

१) मान्यवर व्यक्ती ज्या क्षेत्राशी संबंधित आहे, त्या क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या प्रशासकीय विभागाने १२५ वी जयंती साजरी करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कार्यवाही करावी. तसेच त्यानुसार १२५ वी जयंती साजरी करण्याबाबत प्राप्त प्रस्ताव त्या - त्या प्रशासकीय विभागाने प्राथम्याने हाताळावेत. तदनंतरही मान्यवरांची १२५ वी जयंती साजरी करण्याबाबत विविध प्रशासकीय विभागांचे एकमत न झाल्यास त्याबाबतचा समिती अध्यक्षांचा निर्णय अंतीम राहील.

२) कार्यक्रम समितीने ठरविलेले कार्यक्रम पार पाडण्याकरीता संबंधित व्यक्तीचे कार्य ज्या प्रशासकीय विभागाशी संबंधित आहे, त्या विभागाने कार्यक्रमाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता, त्या प्रशासकीय विभागाच्या सचिवांची तसेच अधिनस्त कार्यालयांतील वरीष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठीत करुन कार्यक्रम समितीने ठरविलेल्या कार्यक्रमांचे नियोजन करावे.

३) थोर व्यक्तींच्या १२५ वी जयंती कार्यक्रमांवरील प्रशासकीय कार्यवाही सर्वसाधारणपणे त्या व्यक्तीचे १२५ वी जयंती वर्ष सुरु होण्याअगोदर किमान ६ महिने आधी सुरु करण्यात यावी. १२५ वी जयंती वर्ष संपल्यानंतर १२५ वी जयंती अनुषंगाने कोणतेही कार्यक्रम हाती घेण्यात येऊ नयेत.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२३०९१११५२२१७१४०७ असा आहे. हा शासन निर्णय, डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रो.दि.कदम-पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
विभागीय आयुक्त, अमरावती
अध्यक्ष, श्री.शिवाजी शिक्षण संस्था, शिवाजी नगर, अमरावती ४४४६०३.
निवड नस्ती (कार्या-२९अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.